पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 31/01/2020 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## . पोलीस अधीक्षक यांच्याकडुन सेवानिवृत्त
## . पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना भावपुर्ण निरोप

.

. दिनांक 31/01/2020 रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका ''निरोप समांरभाच्या'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या 1) पोलिस उपनिरीक्षक श्री व्यास पांडे, बिनतारी संच विभाग ना.ग्रा, 2) सहायक फौजदार श्री महेन्द्र प्रसाद, पोलिस स्टेशन काटोल, 3) सहायक फौजदार श्री प्रमोद पाटील, पोलिस मुख्यालय, 4) सहायक फौजदार श्री कवडु झाडे व 4) सहायक फौजदार दौलत नैताम, पोलिस स्टेशन भिवापुर यांना पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलीस अधीक्षकांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा केली.

. या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, प्रभारी पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री अरूण त्रिपाठी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, वाहतुक शाखेचे श्री संजय पुरंदरे व कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी (स्टाफ), उपस्थित होते.



.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर